नि.फौ.खटला १२४/२०२३

नि क्र. २८

**दोषारोपापुर्वीचा पुरावा**

**साक्षीदार क्र. १**

**साक्षीदाराचे नावः– भगवान मारुती खेडकर ,**

**वयः– ७९ वर्षे, धंदा– सेवानिवृत्त,**

**राहणार ःः– लक्ष्मी नगर पर्वती, पुणे–९.**

**सरतपास शपथेवर ॲड. श्री. डी.टी.बट्टुळे यांचे मार्फत ःः–**

०१. घटना गट नं. ३४, खामगाव शिवार ता. शेवगाव येथे सन १०.१२.२०१७ रोजी सकाळी ११ ते ११:३० वाजण्याच्या सुमारास घडली होती.

०२. मी सन १९९४ साली गट नं. ३४ ही एक हेक्टर १७ आर शेत मिळकत कायम खरेदी केलेली आहे. तेव्हापासुन सदरची मिळकत मी मालकी हक्काने वहिती करत आहे.

०३. दि. १४.०६.२०१२ मध्ये मा. उपधीक्षक भुमीअभिलेख शेवगाव, कार्यालयातील माझ्या शेत मिळकतीच्या खुणा व हद्दी कायम करुन घेतलेल्या आहेत. माझ्या गट नं. ३७ च्या पुर्व बाजुस बैलगाडी, ट्रॅक्टर यांच्यासाठी माझ्या मिळकतीतुन रस्ता सोडलेला आहे.

०४. माझी शेत मिळकत गट नं. ३४ पुर्व बाजुस शिवाजी आणि अशोक यांची गट नं. ३५ हि शेत मिळकत आहे. दोन्ही मिळकतीच्या मधुन दक्षिणोत्तर असा बांध आहे.

०५. आरोपी नं. १ व २ हे सख्खे भाऊ आहेत. व आरोपी नं. ३ हा आरोपी नं. १ व आरोपी नं. २ यांचा सख्खा चुलत भाऊ आहे. ते सगळे एकविचाराचे आहेत.

०६. रविवार दि. १०.१२.२०१७ रोजी सकाळी ११ ते ११:३० वाजण्याच्या सुमारास माझ्या गट नं. ३४ मध्ये रस्त्याच्या अलीकडे माझ्या हद्यीत वेड्या बाभळीचे खोडे काढुन मशागत करत होतो, त्याचवेळी शिवाजी बडधे त्या ठिकाणी आला, व मला म्हणु लागला की, तु तुझ्या हद्यीपलीकडे मशागत करत आहेस तुझा इथे काय संबंध. मी त्यांना

समजावुन सांगितले की, रस्त्याच्या १० फुट अलीकडे माझ्या हद्दीत मी मशागत करत आहे. त्याने लगेच माझी गचांडी धरुन मला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. तेवढयात त्याठिकाणी अशोक बडधे येवून त्यांनी मला जिवे मारण्याची धमकी दिली. व माझा चष्मा ओढुन मोडुन टाकला. तिघांनी मला गंचाडले. शिवाजीने माझे हात धरले, आणि अशोक आणि राजेंद्र यांनी माझ्या उजव्या हाताच्या अंगठयावर लाकडाने मारले. तसेच त्यांनी पाठीवर व डोक्यावर लाकडाने मारले, मग मी आरडा–ओरडा केल्यानंतर जे.सी.बी चा ड्रायव्हर जालिंदर देवढे, अशोक सांगळे, विजय बिनवडे, यांनी सोडवा–सोडव केली. राजेंद्र म्हणाला की, तु आज वाचलास, तुझा कायमचा काटा काढुन टाकील. तुझी ही जमीन विकुन चालता हो. त्यानंतर मी आरोपींना घाबरुन तीन आठवडयात माझी जमीन विकली. मी शेवगाव पोलीस स्टेशनला येवून माझी तक्रार सांगितली. पोलीसांनी माझ्या घरी यादी देवून सरकारी दवाखान्यात उपचारासाठी पाठवले. ग्रामीण रुग्णालयात औषध उपचार घेतल्यानंतर पुन्हा पोलीस स्टेशन येथे आलो. तेथे पोलीसांनी एन.सी. तक्रार नोंदवुण घेतली. पुढे कारवाई न झाल्याने मी कोर्टात फिर्याद दाखल केली. आरोपींनी मला लाकडाने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केलेली आहे. आता साक्षीदाराला दि. १०.१२.२०१७ रोजी दाखल केलेली तक्रार एन.सी. तक्रार दाखवली. ती तीच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. करिता एन.सी. तक्रारीस **नि. २९** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**(न्यायालयाची कार्यालयीन वेळ संपल्याने साक्षीदाराचा दोषारोपापुर्वीचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकु)**

श्रवणोत्तर स्वीकृती

दि. २७.०२.२०२५

sd/–

(श्रीमती.एम.ए.बेंद्रे)

२ रे सहदिवाणी न्यायाधीश क स्तर,

शेवगाव.